# अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) पूर्व, नागपूर यांचे कार्यालय.

नविन प्रशासकीय ईमारत (वनभवन), शासकीय मुद्रनालयाजवळ, झिरो माईल, नागपूर

फोन-०७१२-२५६०९५३, फॅक्स २५५२५१८, ई मेल- apccfwlnagpur@mahaforest.gov.in

ISO CERTIFIED 9001 : 2015


क्रमांक :- कक्ष-१(ब)/सर्व्हे/२३-२४/ ४५० नागपूर -४४०००१,दिनांक-२६ / ६ / २०२३.

प्रति,

मुख्य वनसंरक्षक,
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर

**विषय :- दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्पासाठी आवश्यक चंद्रपूर जिल्हयातील ८०.७७ हे. वनजमीनी वरील खाणपटटा नुतनीकरणाचा प्रस्ताव.**

संदर्भ :- १. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-३(१)/जमिन/प्र.क्र.४८/२०२०-२१/२३३८, दिनांक ०९/०४/२०२१.

२. या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१(ब)/सर्व्हे/१२९,दिनांक ०२/०६/२०२१.

३. मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालयाचे पत्र क्र कक्ष-३(१)/जमिन/प्र.क्र.४८/२०२३-२४/४७२ दिनांक १०/०७/२०२३.

४. केंद्र शासन, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक, ०८/११/२००५.

विषयांकीत प्रकरणी संदर्भ क्र. १ अन्वये मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडुन दुर्गापूर ओपन कास्ट माईन प्रकल्प, नुतनीकरणाचा अहवाल या कार्यालयास दिनांक ०४/०५/२०२१ रोजी प्राप्त झालेला होता. सदर अहवालाचे या कार्यालयाने प्राथमिक संस्करण करुन, अहवालात १ ते ५ त्रृटया काढुन, त्रृटी पुर्तता करुन सुधारीत अहवाल या कार्यालयास सादर करणेबाबत मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांना संदर्भिय पत्र क्रं. २ अन्वये कळविण्यात आले होते.

सबब सदर प्रकरणी मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांनी संदर्भ क्र. ३ अन्वये प्रस्तुत नुतनीकरणाच्या अहवालातील १ ते ५ त्रृटयांची पुर्तता करुन सुधारीत अहवाल ४ प्रतीत दिनांक १०/०७/२०२३ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेला आहे. सदर प्रकरणी मुख्य वनसंरक्षक, चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर यांचे कडुन या कार्यालयास प्राप्त झालेला खाण नुतनीकरण अहवालाचे या कार्यालयाने अवलोकन केले असता, संदर्भ क्र. ४ अन्वये असे निदर्शनास येते की, सदर प्रस्ताव हा नोव्हेबर २००५ ला १ ते १४ अटी व शर्ती च्या अधिन राहुन केंद्र शासन, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांचेकडुन मंजुरी प्रदान करण्यात आलेली होती. त्यानुसार अट अनुक्रमांक ३ नुसार सदर मंजुर प्रकल्पाची कालमर्यादा हि वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अन्वये ८ वर्षासाठीची होती. (सन २००५ ते २०१३ पर्यंत) परंतु सदयस्थित वर्ष २०२३ चालु असल्याने, आपण या कार्यालयास सादर केलेला नुतनीकरणाचा अहवाल दिनांक १०/०७/२०२३ रोजी सादर केलेला होता. वरील कालावधीत प्रकल्प यंत्रणे मार्फत कोळसा खदानीमधुन कोळसा उत्पादन चालु होते किंवा बंद होते याबाबत हे कार्यालय अनभिज्ञ आहे. करीता प्राप्त नुतनी करणाचा अहवाल ३ प्रतीत परत करण्यात येते. सदर प्रकल्प पुनश:च चालु करावयाचे असल्यास त्याबाबत आपले अभिप्रायासह नव्याने प्रस्ताव सादर करण्यात यावा.

सहपत्र :- वरीप्रमाणे, अहवाल ३ प्रतीत.

(sd) २०/७/२३

कापृ ऊ०
25/7/2023

( डॉ. प्रविण चव्हान )
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन्यजीव) पुर्व,नागपूर.

प्रतिलिपी :- प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीस सादर.

प्रतिलिपी :- क्षेत्रीय महाप्रबंधक, डब्ल्युसीएल, चंद्रपूर, क्षेत्र बाबुपेठ, चंद्रपूर , चंद्रपूर यांना माहितीस पुढील कार्यवाहीस अग्रेषित.

क्रमांक कक्ष-३(१)/जमिन/प्र.क्र.48/23-24/9660
चंद्रपूर, दिनांक:- 28-8-23

प्रतिलिपी :- विभागीय वन अधिकारी, चंद्रपूर वनविभाग, चंद्रपूर यांना माहिती व उचित कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

(शुभांगी)
24/08/23
विभागीय वन अधिकारी (नियोजन)
चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर